REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 6 | MARCH - 2017

# मध्ययुगीन महाराष्ट्रातील ‘दाई’चे काम करणा-या स्त्रियांची कामगीरी

डॉ. संतोष अ. जेठीथोर
सहायक प्राध्यापक इतिहास विभाग , डी.आर.माने महाविद्यालय,कागल.

## इतिहासलेखनाविषयी थोडेसे:-

विषयाची मांडणी करण्याअगोदर हा विषय इतिहासलेखनाच्या कोणत्या प्रवाहामध्ये बसतो हे पाहणे गरजेचे ठरते. जगातील आजपर्यंतचा अनुभव असा दिसून येतो की, अनेक इतिहास संशोधकांनी इतिहासाची मांडणी करीत असताना समाजातील उच्चभ्रु लोकांना केंद्रस्थानी मानून इतिहासलेखन केले. त्यामुळे समाजातील खालच्या वर्गाकडे दुर्लक्ष झाले. या त्यांच्या इतिहास मांडणीतून इतिहासाचे वेगवेगळे विचार प्रवाह उदयास आले. उदा. वसाहतवादी विचारप्रवाह, राष्ट्रवादी विचारप्रवाह, मार्क्सवादी विचारप्रवाह, डावाविचारप्रवाह, सबल्टर्न विचारप्रवाह, स्त्रीवादी विचारप्रवाह,इत्यादी. या विचारप्रवाहामधून गुणात्मक व संख्यात्मक वैशिष्टये दिसून येवू लागली. त्यातूनच लोकशाहीचा प्रभाव इतिहासलेखनावरही पडला व समाजातील सर्व घटकांना समान न्या दिला पाहिजे ही भावना वाढीस लागली.

२०व्या शतकात इटालियन विचारवंत ॲन्तोनिओ ग्रामची याने १९७०च्या सुमारास जगामध्ये पहिल्यांदा सबाल्टर्निझमचा नवा विचार मांडून वंचिताच्या इतिहासाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. संस्कृतीसमुहापैकी तळागाळातला सर्वसामान्य माणूस नेमके कोणते योगदान देतो या विषयीचा तत्वविचार ग्रामचीने दिला. त्याच्या मते संस्कृतीच्या वाटचालीत या सांस्कृतीक सत्तेकडून अव्हेरल्या गेलेल्या समाजगटाचे शोषण होत असते. हे दुलक्षित, उपेक्षित घटक हा मानवी इतिहातला महत्वाचा घटक असतो. त्याच्या स्थिती गतीची नोंद केल्याशिवाय इतिहासलेखन पूर्ण होत नाही.[१] ग्रामचीने History from below हा विचार इतिहासशास्त्रात रुढ केला.[१]

सबाल्टर्न इतिहासलेखन परंपरेची सुरुवात भारतामध्ये पहिल्यांदा रणजित गुहांनी केली इतिहासविषयीच्या पारंपारिक समजूतीला छेद देत. त्यांनी हे स्पष्ट केले की, इतिहाच्या निर्मिती प्रक्रियेत समाजतील सारेच घटक सक्रिय असतात. समाजातील जडण- घडणीमध्ये बेदखल झालेल्या माणसाला मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचे काम या सबाल्टर्न विचारप्रवाहाने केले. या विचारप्रवाहाने तळागाळातील लोकांची नोंद घेतली.[२]

वरील या विचारप्रवाहाचा आधार घेवून मध्ययुगीन काळात अशा काही व्यक्ती होत्या त्यांचे कर्तृत्व व कामगीरी उजेडात आली नाही ती उजेडात आणण्याचा प्रयत्न या शोधनिबंधाच्या माध्यमातून करणार आहे.

## मध्ययुगीन महाराष्ट्र संकल्पना

समकालीन महाराष्ट्र प्रदेश आणि मध्ययुगीन महाराष्ट्रातील भौगोलिक स्थिती म्हणजेच (इ.स.८वे शतक ते इ. स.१८व्या शतकापर्यंत) यामध्ये बरीच तफावत आहे. मध्ययुगीन महाराष्ट्राचा प्रदेश हा दख्खनचा भाग असून त्यामध्ये कर्नाटकचा समावेश होत होता.म्हणून त्यास ‘दख्खन’ या नावाने संबोधले जात होते. या मध्ययुगीन महाराष्ट्र संकल्पनेविषयी अनेक इतिहासकारांनी आपले विचार मांडले आहेत. याविषयी इतिहासकार फेरिस्ता याने आपल्या तारिख - ए - फेरिस्ता या ग्रथात म्हणतो, ‘हिंदसेना म्हणजे एक महान पुरुष असून दख्खन हा त्याचा एक पुत्र होय आणि त्याच्या पुत्राला मराठा,कन्हर,आणि तेलंग असे विभाग म्हणजे मराठयांचा महाराष्ट्र कन्हरांचा कर्नाटक आणि तिलंगांचा तेलंगण या नावाने पुढे ओळखला जावू लागला.’[३]

भावे वा.कृ.यांनी मुसलमान पूर्व महाराष्ट्र या ग्रंथात महाराष्ट्राला ‘दंडकारण्य’ व ‘दक्षिणापथ’ या नावाने संबोधले आहे.[४]

शेरवानी या ‘हिस्ट्री ऑफ मेडिवल डेक्कन’ या ग्रंथात

महाराष्ट्राला तत्कालीन काळात 'दंडकारण्य' किंवा 'दक्षिणापथ' या नावने संबोधले जात होते. दक्षिणापथाविष्सयीचा उल्लेख रामायण व महाभारतामध्ये मिळतो. त्याचबरोबर मार्कडेंयवायू आणि मत्सपुराण यामध्येही 'दक्षिण' किंवा 'दक्षिणापथ' असा उल्लेख मिळतो.[५]

## 'दाई' म्हणजे काय?

'दाई' म्हणजे लहान मुलांचे संगोपन व देखभाल करणारी स्त्री होय. मध्ययुगीन काळात मुस्लिम राज्यकर्ते जनानखाने बाळगत असत. या जनानखान्यात अनेक स्त्रिया असत. यामध्ये अनेक स्त्रिया दाई म्हणून काम करत.

**मोल्सवर्थ** यांच्या मराठी - इंग्रजी शब्दकोश यामध्ये दाई चा अर्थ पुढीलप्रमाणे A Wet Nurse – लहान मुलाचे लालनपालन करणारी स्त्री, अंगावरचे दुध पाजणारी स्त्री असा अर्थ स्पष्ट केला आहे.[६]

## 'दाई'चे काम करणा-या स्त्रियांची कामगीरी

मध्ययुगीन काळात जनानखान्यातील अनेक स्त्रियांनी स्वत:च्या कर्तृत्वाने राजकारणामध्ये आपला वेगळा ठसा उमटविला. यामध्ये ताउसमा, मुर्तफा यासारख्या स्त्रिया दिसून येतात. परंतू यांची कामगीरी जास्त उजेडात आली नाही. अशा या स्त्रियांची कामगीरी पाहणे गरजेचे ठरते.

मुस्लिम काळात मोठयाप्रमाणात गुलामांचा व्यापार चालत असे त्यामध्ये पुरूषांबरोबरच स्त्रियांनाही गुलाम म्हणून विकले जात असे तर काहीवेळा युद्धात पराजित झालेल्या सैनिकांना व त्यांच्या बायका मुलांना गुलाम बनविण्यात येत असे. गुलाम बनविलेल्या स्त्रियामध्ये काही स्त्रिया हया राजघराण्यात दाईचे काम करीत असत.या दाई प्रामाणिकपणे आपल्या मालकाची सेवा करत. तिच्या प्रामाणिकपणाबद्दलचे आदिलशाहीतील एक उदाहरण दिसून येते. यामध्ये तिचे नाव मिळत नाही परंतू तिच्या कार्याचा उल्लेख मात्र मिळतो. युसूफ आदिलशाहाला मारण्याचा कट रचल्यानंतर त्याच्या आईने युसूफशी साम्य असणा-या गुलाम मुलाला सुलतान महंमदच्या हाती दिले व त्या गुलाम मुलाला ठार मारण्यात आले. या लहान युसूफ आदिलशाहाच्या देखभालीची व संगोपनाची संपूर्ण जबाबदारी राजदरबारातील एका दाईवर सोपविली. या दाईने अतिशय प्रमाणिकपणे त्याचा सांभाळ केला व त्याला त्याच्या आईच्या ताब्यात दिले. म्हणून पुढे युसूफ आदिलशाहा विजापूरचा आदिलशाहा बनला.[७]

दुसरे एक उदहरण ईस्माइल आदिलशाहाच्या काळातील पहावयास मिळते. दरबारातील कमालखानाचे वाढते वर्चस्व नष्ट करण्यासाठी ईस्माइल आदिलशाहाच्या आईने एका दाईचा वापर करून कमालखानाला संपविले.यामध्ये मात्र त्या दाईला आपले प्राण गमवावे लागले.[८]

**'गुलशन - ए - इब्राहिमी**' या ग्रंथात दाईच्या कामगीरीविषयीचा उल्लेख मिळतो. ईस्माइल आदिलशाहाच्या काळात त्याची आई पुँजी खातून व चुलती दिलशाद आगा यांनी केलेल्या युद्धप्रसंगी जनानखान्यातील अनेक स्त्रियांनी सहभाग नोंदविला होता.त्यमध्ये या युद्धप्रसंगी ईस्माइल आदिलशाहावर पिवळे छत्र धरणारी **मुर्तफा** नावाची तुर्की स्त्री होती. या युद्धामध्ये स्त्रियांनी आदिलशाहाला विजय मिळवून दिला. अशा या सर्वसामान्य स्त्रियांनी केलेल्या पराक्रमाची नोंद घेतली गेली नाही.[९]

सिकंदर आदिलशाहाच्या काळात काही दाई हया स्वकर्तृत्वावरती उच्चपदावरती गेल्याची काही उदाहरणे मिळतात. 'ताउसमा' नावाची दाई ही अत्यंत हुशार होती.तिच्या हुशारीमुळे तिला 'सरखेल' हे पद देण्यात आले होते. सिकंदर आदिलशाहाची बहिण शहराबानू उर्फ शाहा बिबि हिने आका खुसराव याच्या कैदेतून मसउदखान त्याची बायकामुले सोडवून आणण्याची जबाबदारी 'ताउसमा' या दाईवर सोपविण्यात आली. ही कामगीरी तिने योग्यरित्या पार पाडली. या 'ताउसमा'चा शहराबानूवर मोठा प्रभाव होता.[१०]

सेतू माधवराव पगडी यांच्या 'मोगल दरबारची बातमीपत्रे' खंड २ मध्ये औरंगजेब काळातील दाई च्या कामगीरीबद्दल उल्लेख मिळतो. 'माहबंगा' नावाच्या दाईवर औरंगजेबाने युद्धमोहिमेवर गेल्यावर राजदरबारातील देखभाल करण्याची जबाबदारी सोपविली ती तिने अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडली.[११]

## सारांशः-

वरील विवेचनावरून असे दिसून येते की, इतिहासामध्ये जे अनेक विचारप्रवाह आहेत. त्यामध्ये सबाल्टर्न विचारप्रवाह हा या दृष्टिकोनातून अतिशय महत्वाचा आहे. या विचारप्रवाहामुळे समाजातील तळागाळातील लोकांचा इतिहास पुढे येण्यास मदत झाली. मध्ययुगीन महाराष्ट्रातील दाईनी केलेली कामगीरी ही खरोखरच उल्लेखनिय मानले जाते. त्यांच्या या कार्यामुळे अनेक राज्यकर्ते आपला राज्यकारभार चालवू शकले. या दाईंनी अत्यंत प्रामाणिपणे आपले काम केले. अत्यंत महत्वाची कामगीरी पार पाडली असली तरी त्या फारशा उजेडात आल्या नाहित.

## संदर्भः-

१. देव,प्रभाकर, इहिासशास्त्र, डेन टॉनिक प्रकाशन, नाशिक, २००७, पृ.८४
२. कित्ता,पृ.८५
३. शेरवानी,एच.के.,व जोशी पी.एम., हिस्ट्री ऑफ मेडिवल डेक्कन (१२९५ - १७२४),खंड १, आंध्र प्रदेश सरकार,१९७३,पृ.४
४. भावे,वा.कृ.,'मुसलमान पूर्व महाराष्ट्र खंड १, लोकजीवन प्रकाशन,पुणे,१९४७,पृ.३
५. शेरवानी,एच.के.,व जोशी पी.एम.,हिस्ट्री ऑफ मेडिवल डेक्कन (१२९५ - १७२४),खंड १,आंध्र प्रदेश सरकार,१९७३,पृ. १
६. मोल्सवर्थ, मराठी - इंग्रजी शब्दकोश, वरद प्रकाशन,पुणे,२००१,पृ.४४०
७. बेंद्रे,वा.सी.(संपा.), 'विजापूरची आदिलशाही', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,१९६८,पृ.८ - ९
८. कुंटे,(डॉ) भ.ग., 'गुलशन - ए - इब्राहिमी', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,१९८२,पृ.४०० - ४०१
९. कित्ता, पृ. ४०२.
१०.बेंद्रे,वा.सी.(संपा.), 'विजापूरची आदिलशाही', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,१९६८,पृ.५४५.
११.पगडी, सेतू माधवराव, (संपा.), 'मोगल दरबारची बातमीपत्रे' खंड २, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,१९८३, पृ.२२७.